नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ६८ Issue - 68 | वार शुक्रवार दि. २५ जुलै २०२५ Blow- Friday Date 25 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात अतिवृष्टीचा इशारा

## पुढील चार दिवस राहणार मुसळधार पाऊस; काही जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यभरात ब्रेक घेतलेल्या पावसाने गेल्या दोन दिवसांपासून अनेक भागांत जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. पावसाची ही स्थिती पुढील ४ दिवस कायम राहणार असल्याचे हवामान विभागाने सूचित केले आहे. कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत मुसळधार पाऊस बरसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



कोकणातील रायगड आणि रत्नागिरी, तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे साताऱ्यातील काही भाग आणि विदर्भात अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. घाटमाथ्यावर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर उद्या २५ जुलैला या भागांत रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

उर्वरित महाराष्ट्रातही मध्यम स्वरुपाचा पाऊस बरसणार आहे. मराठवाड्यासह, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भाच्या भागांत २६ जुलैला यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मुंबई, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

या भागांत वीजांच्या कडकडाटासह पाऊस बसण्याची शक्यता आहे. यातच कोकणात पावसाची ही स्थिती पुढील चार दिवस कायम राहणार असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पावसाने पुनरागमन केल्याने बळीराजा सुखावला आहे. तर दुसरीकडे रायगडला मुसळधार पावसाने झोडपले आहे. जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड, रोहा, श्रीवर्धन, माणागाव आणि इतर दमदार पाऊस झाला आहे. किनारपट्टी भागात पावसाचा जोर वाढला आहे. परिणामी जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे हवामान विभागने येत्या ४८ तासांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. रत्नागिरीलाही अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

मुंबई आणि उपनगरांमध्येही दमदार पाऊस सुरु आहे. हवामान विभागाने मुंबईसाठी पुढील चार दिवस धोक्याचे असल्याचे सूचित केले आहे. २६ जुलैला समुद्रात ४.६७ मीटर उंच लाटा उसळणार असल्याचीही शक्यता आहे. नागरिकांनी समुद्रकिनाऱ्यांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करारामुळे कापड-पादत्राणे स्वस्त होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या ब्रिटनच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात भारत आणि ब्रिटन यांच्यातील मुक्त व्यापार करार झाल आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टारमर यांनी चेकर्स हाऊसमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं स्वागत केलं. या दरम्यान, भारताचे वाणिज्य मंत्री पियुष गोयल आणि ब्रिटनचे वाणिज्य मंत्री जोनाथन रेनॉल्डस यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

भारत आणि ब्रिटन यांच्यातील या करारामुळं दोन्ही देशांमध्ये व्यापारासंदर्भतील नव्या अध्यायाची सुरुवात होणार आहे. दोन्ही देशांमधील गुंतवणूक वाढेल याशिवाय सामान्य लोकांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील. एफटीएमुळं औषधं, कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, फॅशनचं साहित्य, स्वस्त होईल. काही गोष्टी महागतील यामुळं याचा परिणाम थेट सामान्य जनतेवर होणार आहे.

वस्त्रोद्योग आणि कापड व्यापार

भारतातून ब्रिटनला निर्यात केल्या जाणाऱ्या कापड आणि होम टेक्सटाईल उत्पादनांवर सध्या ८ ते १२ टक्के टॅरिफ आहे ते रद्द केलं जाईल. यामुळं भारत आता बांगलादेश आणि व्हिएतनाम या सारख्या कापड निर्यातदार देशांचा स्पर्धक बनेल.

रत्न, दागिने आणि चर्मोद्योग

या करारामुळं सोने आणि हिरे यासारख्या मौल्यवान उत्पादनांसह चामड्याच्या वस्तूंवरील कर देखील ब्रिटनकडून हटवला जाईल. यामुळं कोणत्याही प्रकारचं अतिरिक्त शुल्क द्यावं लागणार नाही. भारताच्या लघुउद्योग आणि अलिशान ब्रँडसला याचा फायदा होईल.

अभियांत्रिकी वस्तू आणि ऑटो पार्टस

भारतात बनवल्या जाणाऱ्या मिशनरी, अभियांत्रिकी टूल्स, वाहनांचे सुटे भाग यावर ब्रिटनकडून आयात शुल्क लादलं जाणार नाही. त्यामुळं यूके आणि यूरोपच्या औद्योगिक सप्लाय चेनमध्ये भारताची भागीदारी वाढेल.

आयटी आणि प्रोफेशनल सेवा

मुक्त व्यापार करारामुळं इंजिनिअरिंग, आर्किटेक्चर आणि अकाऊंटिंग या क्षेत्रात प्रोफेशनल क्वालिफिकेशन्स आणि व्हिसा नियमांमध्ये सूट दिली जाईल. भारताचे प्रोफेशनल्स आता ब्रिटनमध्ये जाऊन काम करु शकतात. यामुळं आयटी, फायनान्स, कायदा आणि आरोग्य या क्षेत्रात पाच वर्षात ६०००० नव्या नोकऱ्या निर्माण होऊ शकतात.

या व्यापार करारामुळं भारतीय औषधं कंपन्यांना ब्रिटनमधील नियामक प्रक्रिया सोपी झाल्यानं फायदा होईल. औषधं स्वस्त होतील.जेनेरिक औषधांची निर्यात होऊ शकते. भरतीय कंपन्यांच्या औषधांना मंजुरी प्रक्रिया सोपी होईल.

बासमती तांदूळ, झींगा यासारखी सागरी उत्पादनं, प्रिमियम चहा, मसाले यासह भारतीय कृषी उत्पादनांच्या आयातीवरील कर हटवले जातील. आसाम, गुजरात, केरळ आणि पश्चिम बंगालच्या राज्यातील निर्यातदारांना फायदा होईल.

मुक्त व्यापार करारामुळं कृषी क्षेत्रातील रसायनं, प्लास्टिक, स्पेशल केमिकल्स यावरील कमी टॅरिफ मुळं गुजरात आणि महाराष्ट्रच्या निर्यातदारांना फायदा होईल. व्यापार करारानुसार २०३० पर्यंत ब्रिटनसोबत रसायन निर्यात दुप्पट करण्याचं भारताचं लक्ष आहे.

या करारामुळं सौर ऊर्जा, ग्रीन हायड्रोजन, इलेक्ट्रिक वाहनांसाठीच्या पायाभूत सुविधा यामुळं रिन्यूएबल एनर्जी क्षेत्रात भारत आणि ब्रिटनच्या संयुक्त कंपन्या सुरु होऊ शकतात. ब्रिटन भारतातील क्लीन एनर्जी क्षेत्रात गुंतवणूक करु शकते.

दारुवरील आयात शुल्क कमी (ब्रिटनला फायदा)

भारत आणि ब्रिटन यांच्यातील व्यापार कराराचा फायदा दारु पिणाऱ्यांना होणार आहे. भारत पुढील १० वर्ष स्कॉच व्हिस्कीवर १५० टक्के टॅरिफ घटवून ३० टक्के करेल. भारत आणि ब्रिटन यांच्यातील व्यापार वाढेल.

# जेएनयुमध्ये मराठी भाषा अध्यसन केंद्राचे उद्घाटन; विद्यार्थ्यांचं आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशाची राजधानी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात म्हणजे जेएनयू छत्रपती शिवाजी महाराज सामरिक अध्यासन केंद्र आणि कुसुमाग्रज मराठी भाषा अध्यासनाची आजपासून सुरुवात होत आहे. त्यासाठी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यभाषा मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितात हा सोहळा संपन्न होत असतानाच दुसरीकडे एसएफआय म्हणजे स्टुंडट फेडरेशन ऑफ इंडियाच्यावतीने या उद्घाटन सोहळ्याला विरोध करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या गेटवर येऊन आपल्या मागण्यांच्या अनुषंगाने विरोध दर्शवला आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या धोरणांना विरोध करत विद्यार्थी आक्रमक झाले होते, यावेळी त्यांच्याकडून घोषणाबाजी देखील करण्यात आली.

दिल्लीतील जेएनयूमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज सामरिक आणि संरक्षण विशेष अध्यासन केंद्राचा कोनशिला समारंभ आणि कुसुमाग्रज मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती विशेष अध्यासन केंद्राचे उदघाटन आज झाले. तत्पूर्वी येथील डाव्या विद्यार्थी संघटनांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दौऱ्याला विरोध केला होता. त्यामुळे, येथे मोठा पोलीस बंदोबस्त आणि जेएनयुतील सुरक्षा रक्षकांनी विद्यार्थ्यांना रोखले होते.

### महायुती सरकारविरुद्ध घोषणाबाजी

देवेंद्र फडणवीस गो बॅक म्हणत जेएनयूच्या विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी केली. महाराष्ट्रात जनसुरक्षा विधेयकास मंजुरी दिल्याच्या विरोधात आणि हिंदी भाषा सक्तीच्या करण्याच्या विरोधात आम्ही एकत्र येत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या दिल्ली, जेएनयू दौऱ्याला विरोध करत असल्याचे आंदोलक विद्यार्थ्यांनी बोलताना म्हटले. समाजात विष कालविण्याचं काम महाराष्ट्रातील राजकारण्यांकडून होत आहे, द्वेष पसरवण्याचं काम केलं जातंय,



मुसलमांना टार्गेट केलं जात आहे, असे म्हणत येथील एसएफआयच्या विद्यार्थ्यांनी देवेंद्र फडणवीसांच्या दौऱ्याला आपला विरोध दर्शवला. शिवाजी महाराजांचं नाव घेऊन, त्यांचं नाव देऊन तुम्ही समाजात तेढ निर्माण करण्याचं काम करता, असेही येथील विद्यार्थ्यांनी म्हटलं. यावेळी, हाती डपली घेऊन, हाती बॅनर घेऊन त्यांनी महायुती सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

'जनसुरक्षा कायदा मागे घ्या'चे फलक हाती घेऊन 'एसएफआय' या डाव्यांच्या विद्यार्थी संघटनेने केलेले आंदोलन हा पुन्हा एकदा छुपा अजेंडा आहे, असे भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी ट्विट करुन म्हटं. तसेच, महाराष्ट्राचे आराध्यदैवत आणि ज्यांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले, त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे जेएनयूत सुरु होत असलेल्या सामरिक अध्ययन केंद्राला विरोध हा त्यांचा मुख्य अजेंडा आहे. ही तीच मंडळी आहेत, ज्यांनी 'भारत तेरे तुकडे होंगे' अशा घोषणा दिल्या होत्या, असेही त्यांनी म्हटलं आहे.

येथील ऋमराठी अध्यासन केंद्रास कुसुमाग्रज यांचं नाव देण्याची मागणी केली होती. त्यानुसार, महाराष्ट्र सरकारने आधी २ कोटी रुपयांचा निधी असून आणखी तीन कोटींचा निधी दिला आहे. मराठी भाषेसंदर्भाने राजकारण करण्यापेक्षा साता समुद्राच्या पलिकडे मराठी भाषा नेण्याचं काम केल पाहिजे, असे म्हणत मंत्री उदय सामंत यांनी ठाकरे बंधूंना टोला लगावला होता. तसेच, जेएनयूच्या कुलगुरू या परराज्यातील असल्या तरी त्यांच मराठीवर प्रेम आहे, असेही त्यांनी म्हटलं.

## मुख्यमंत्र्यांनी दिल्लीतून ठणकावलं

## अध्यासन केंद्राचा कोनशिला समारंभास उपस्थिती

# मराठी भाषेचा अभिमान, पण भाषेवरुनची मारहाण खपवून घेणार नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील कोट्यवधी मराठीजनांसाठी आजचा दिवस आनंद आणि अभिमानाचाच म्हणावा लागेल. कारण, देशाची राजधानी दिल्लीतील जेएनयुमध्ये मराठी भाषेचा गौरव आणि सन्मान करण्यात आलाय. येथील विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज सामरिक अध्यासन केंद्र आणि कुसुमाग्रज मराठी भाषा अध्यासनाची आजपासून सुरुवात झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यभाषा मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितात हा सोहळा संपन्न झाला. श्री छत्रपती शिवाजी महाराज सामरिक आणि संरक्षण विशेष अध्यासन केंद्राचा कोनशिला समारंभ आणि कुसुमाग्रज मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती विशेष अध्यासन केंद्राचे उदघाटन झाले. यावेळी, बोलताना मुख्यमंत्र्यांनी मराठी भाषेचा अभिमान आहे, ती अभिजात आहे, असे म्हटले.



मात्र, भाषेवरुन कुणाला मारहाण करणे योग्य नाही, ते खपवून घेणार नाही, असेही त्यांनी ठणकावले.

देशातील अतिप्राचीन भाषांपैकी एक भाषा मराठी आहे, याचे अनेक पुराव सापडले आहेत. त्यामुळेच, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपली मागणी स्वीकारली असून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला. मराठी ही अगोदरच अभिजात होती, पण त्याला आता राजाश्रय मिळाला आहे. आपल्या सर्वांसाठी ही अभिमानाची बाब आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. मराठी भाषेने देशाला समृद्ध केलं आहे, आपली नाट्यसृष्टी हे सर्वोत्तम आहे. देशामध्ये थेअटरने जर कोणत्या भाषेनं टिकवलं आणि समृद्ध केलं असेल तर ती मराठी आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी दिल्लीतील कार्यक्रमात बोलताना म्हटलं. म्हणूनच या भाषेवर अध्यसन आणि संधोशन झालं पाहिजे म्हणून हे अध्यसन केंद्र इथं झालंय, अशी माहितीही फडणवीसांनी दिली.

भाषेवरुनची मारहाण खपवून घेणार नाही

मातृभाषेचा अभिमान असलाच पाहिजे, त्यासोबतच इतर भारतीय भाषांचा अभिमान आपण बाळगला पाहिजे. कारण, आम्ही इंग्रजीचा पुरस्कार करतो, इंग्रजीला पायघड्या घालतो आणि भारतीय भाषांना विरोध करतो, याचं कुठतरी दु:ख होतं. आपला वाद मराठी आणि हिंदी नाही. पण, मराठीसोबत इतर भारतीय भाषाही स्वीकारल्या पाहिजे, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटलं.

महाराष्ट्रात मराठी भाषेचा आग्रह होणे स्वाभाविक आहे, ते चुकीचे नाही. मात्र, भाषेवरुन वाद होणे, कुणाला मारहाण करणे कदापि सहन केलं जाणार नाही. या अगोदरही आम्ही कारवाई केली असून यापुढेही कोणी तसा प्रयत्न केल्यास कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना म्हटले.

# एसीबीने लाचखोरी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या

## एकाच दिवशी केडीएमसीतील ३ अधिकारी चतुर्भुज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कल्याण : केडीएमसीमध्ये भ्रष्टाचाराचा पुन्हा एक नवा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे लाचलुचपत विभागाने म्हणजेच एसीबीने लाचखोरी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मुसक्या देखील आवळल्या आहेत. केडीएमसीच्या एखाद्या लाचखोर अधिकाऱ्याविरोधात कारवाई होण्याची ही पहिली वेळ नाही. याआधीदेखील अनेकदा अशाप्रकारच्या घटना समोर आल्या आहेत. पण तरीदेखील या घटना कमी होण्याचं नाव घेताना दिसत नाहीत. गेल्या पाच वर्षांपासून केडीएमसीच्या निवडणुका रखडल्या आहेत. इथे अधिकाऱ्यांच्या हातात सर्व यंत्रणा आहे. पण त्याचाच अधिकारी गैरवापर करताना दिसत आहेत. यातून भ्रष्टाचाराचा महापूर येताना दिसतोय. एसीबीने आजच्या कारवाईत तब्बल ३ अधिकाऱ्यांना बेड्या ठोकल्या आहेत.



केडीएमसीमध्ये एकाच दिवशी तीन अधिकाऱ्यांना ठाणे लाचलुचपत विभागाकडून रंगेहात अटक करण्यात आली आहे. पालिकेचे घनकचरा विभागाचे अधिकारी वसंत देवळूरकर, सुदर्शन जाधव यांना अटक करण्यात आली आहे. या अधिकाऱ्यांनी आजारी कर्मचाऱ्याला कामावर रुजू करण्यासाठी २५ हजार रुपयांची मागणी केली होती. लाचलुचपत विभागाने २० हजारांची लाच घेताना दोन्ही अधिकाऱ्यांना ताब्यात घेतलं आहे. तसेच केडीएमसीच्या सहाय्यक अभियंता रवींद्र आहिरे याला बांधकाम परवानगी देण्यासाठी बांधकाम व्यावसायिकाकडून ४० हजार रुपये लाज घेताना रंगेहात अटक करण्यात आली. आतापर्यंत केडीएमसीमधील ४७ अधिकारी आणि कर्मचारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात सापडले आहेत.

या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महापालिका निवडणुका लवकरात लवकर घेण्यात याव्यात, अशी मागणी जोर धरु लागली आहे. महापालिका निवडणुका झाल्यानंतर अधिकारी वर्गाचा भ्रष्टाचार आणि मनमानी कराभरावर लगाम बसेल, असं सामाजिक कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे.

दरम्यान, मनसे नेते आणि माजी आमदार राजू पाटील यांनी लालचलुचपत विभागाच्या कारवाईनंतर आपल्या 'एक्स' अकाउंटवर भूमिका मांडली आहे. त्यांनी 'जसे राज्यकर्ते तसे अधिकारी', अशा शिर्षकाखाली निशाणा साधला आहे. आज पुन्हा एकदा घऊ्चउ चे ३ भ्रष्ट अधिकारी एकाच दिवशी लाचलुचपत विभागाच्या सापळ्यात सापडले. एकंदरीतच सुंपूर्ण घऊ्चउ मधील जनता या भ्रष्ट सत्ताधारी आणि अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे फोफावलेल्या अनागोंदीच्या सापळ्यात अडकली आहे. परंतु याचे आमच्या शासनकर्त्यांना काहीच सोयरसुतक नाही. हे अनेकदा अधोरेखित झाले आहे. त्यांचे नेहमीचे एकच घोषवाक्य आहे , 'अपना काम है बनता, भाड मे जाये जनता' बरोबर ना?, असा प्रश्न उपस्थिती केला आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### अतिवृष्टीचा इशारा

पावसाने पुनरागमन केल्याने बळीराजा सुखावला आहे. तर दुसरीकडे रायगडला मुसळधार पावसाने झोडपले आहे. जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड, रोहा, श्रीवर्धन, माणागाव आणि इतर दमदार पाऊस झाला आहे. किनारपट्टी भागात पावसाचा जोर वाढला आहे. परिणामी जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे हवामान विभागने येत्या ४८ तासांसाठी रेड अलर्ट जारी कऱण्यात आला आहे. रत्नागिरीलाही अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.राज्यभरात ब्रेक घेतलेल्या पावसाने गेल्या दोन दिवसांपासून अनेक भागांत जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. पावसाची ही स्थिती पुढील ४ दिवस कायम राहणार असल्याचे हवामान विभागाने सूचित केले आहे. कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत मुसळधार पाऊस बरसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकणातील रायगड आणि रत्नागिरी, तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे साताऱ्यातील काही भाग आणि विदर्भात अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. घाटमाथ्यावर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर उद्या २५ जुलैला या भागांत रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे. उर्वरित महाराष्ट्रातही मध्यम स्वरुपाचा पाऊस बरसणार आहे. मराठवाड्यासह, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भाच्या भागांत २६ जुलैला यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## श्रावणात घन निळा बरसला....!



### (श्रावणांत सणांची रेलचेल)

श्रावण महिना हा हिंदू पंचांगानुसार आणि भारतीय सौर दिनदर्शिकेनुसार वर्षातला पाचवा महिना आहे. या महिन्याच्या पौर्णिमेला चंद्र श्रवण नक्षत्रात असतो, त्यावरून या महिन्याला 'श्रावण' असे नाव मिळाले आहे. भारतीय राष्ट्रीय दिनदर्शिकेतला श्रावण महिना हा जुलैच्या उत्तरार्धात पौर्णिमेपासून सुरू होतो आणि ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात पुढील पौर्णिमेच्या दिवशी संपतो. तमिळ कॅलेंडरमध्ये तो 'अवनी' म्हणून ओळखला जातो आणि तो सौर वर्षाचा पाचवा महिना असतो. चंद्र धार्मिक कॅलेंडरमध्ये श्रावण हा अमावस्येपासून सुरू होतो आणि तो वर्षाचा पाचवा महिना असतो. श्राबोन हा सौर बंगाली कॅलेंडरचा चौथा महिना आहे, तसेच नेपाळी कॅलेंडरचा चौथा महिना असतो. श्रावण हा वर्षा ऋतुचा (पावसाळ्याचा) दुसरा महिना असतो.

साधारणतः ८ किंवा ११ आणि क्वचित १९ वर्षांनी अधिक श्रावेतो. त्या महिन्यात येणाऱ्या शुक्ल किंवा वद्य या दोन्ही एकादश्यांना कमला एकादशी हे नाव आहे. उत्तर हिंदुस्थानात या एकादश्यांना अनुक्रमे पद्मिनी आणि परम एकादशी म्हणतात. एकादश्या वगळल्या तर अधिक श्रावणात कोणतेही हिंदू सण किंवा व्रताचे दिवस येत नाहीत. ज्यावर्षी अधिक श्रावण असतो त्यावर्षी पाच महिन्यांचा चातुर्मास असतो. चातुर्मासात लग्ने होत नसल्याने ती अधिक श्रावणातही होत नाहीत. श्रावण महिन्याला सर्व सणांचा राजा म्हटले जाते. श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्या ना कोणत्या देवतेची पूजा वा व्रत करण्याची हिंदू आणि जैनधर्मीयांची परंपरा आहे. या विशिष्ट महिन्यात केल्या जाणाऱ्या शंकराच्या उपासनेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. संपूर्ण भारतीय उपखंडासाठी श्रावण महिना खूप महत्त्वाचा आहे कारण तो नैऋत्य मान्सूनच्या आगमनाशी जोडलेला आहे. श्रावण शुद्ध पंचमीच्या दिवशी नागांची पूजा करण्याची परंपरा भारतीय संस्कृतीत प्रचलित आहे.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

तसेच रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा हा सण हिंदू महिन्यांपैकी श्रावण महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. या दिवशी समुद्रकिनारी राहणारे लोक वरुणदेवते प्रित्यर्थ समुद्राची पूजा करून त्याला नारळ अर्पण करतात. या दिवशी मासेमारी करणारे महाराष्ट्रातले कोळी व समुद्राशी निगडित असलेल्या व्यवसायांतील इतर लोक समुद्राची पूजा करून त्यास नारळ अर्पण करतात. पावसाळ्यात बंद असलेले मासे पकडणे या दिवसापासून परत सुरू होते. ज्या कुटुंबात रोजच्या खाण्यात नारळ नसतो, त्याही मराठी घरांमधून या दिवशी नारळीभात, नारळाच्या वड्या यांसारखे नारळापासून बनलेले खाद्य पदार्थ बनवतात. याच दिवशी बहीण भावाच्या हातात राखी बांधते त्यावरून या पौर्णिमेला राखी पौर्णिमा असे म्हणतात. ही पौर्णिमा पोवती पौर्णिमा म्हणूनही ओळखली जाते, कारण या दिवशी सुताची पोवती करून ती विष्णू, शिव, सूर्य इत्यादी देवतांना अर्पण करतात व मग कुटुंबातील स्त्री-पुरुष ती पोवती हातात बांधतात.

या दिवशी श्रवण नक्षत्र असल्याने ब्राह्मण पुरुष उपाकर्म करून नवीन यज्ञोपवीत धारण करतात. या विधीला श्रावणी असे नाव आहे. श्रावणी ही श्रावण पौर्णिमेलाच करतात असे नाही, श्रावणी हस्त नक्षत्रात चंद्र असताना 'श्रावण शुक्ल पंचमी'लाही असू शकते. पौर्णिमेला चंद्रग्रहण असल्यास श्रावण पौर्णिमेला श्रावणी नक्कीच करत नाहीत. ऋग्वेद्यांची श्रावणी, यजुर्वेद्यांची श्रावणी, तैत्तिरीय शाखा व तिच्या अंतर्गत येणाऱ्या हिरण्यकेशी उपशाखेच्या ब्राह्मणांची श्रावणी या वेगवेगळ्या दिवशी असू शकतात. श्रावण महिन्यात लागोपाठच्या दोन दिवशी पौर्णिमा असेल, तर पहिल्या दिवशी नारळी पौर्णिमा आणि दुसऱ्या दिवशी राखी पौर्णिमा असते. राखी पौर्णिमेच्या दिवशी भारताच्या उत्तराखंड राज्याच्या चंपावत जिह्यातल्या देईपुरी इलाख्यात बरही देवीला खुश करण्यासाठी गावातल्या दोन गटांत एकमेकांवर दगडफेक होते. दगडफेकीत अनेकजण घायाळ होतात. २०१९ साली १२० लोक जखमी झाले होते. मात्र हायकोर्टाने दगडफेकीवर बंदी आणल्याने काही लोकांनी दगडांऐवजी सफरचंदे फेकून मारली.

उत्तर भारतात या महिन्यात झुलन यात्रा, रक्षाबंधन, जन्माष्टमी व नंदोत्सव हे उत्सव विशेष महत्त्वाचे मानतात. झुलन जत्रा हा दोलोत्सव आहे. पौर्णिमेच्या दिवशी राधा व कृष्ण यांना हिंदोळ्यावर बसवून झोके देतात व स्त्रिया त्यांच्यासंबंधी गीते गातात. हा उत्सव एकादशी पासून पौर्णिमेपर्यंत चालतो. कृष्ण जन्माच्या दुसऱ्या दिवशी नंदोत्सव करतात. नंदाला पुत्र झाला असे समजून या दिवशी हळदी-कुंकू मिसळलेले पाणी पिचकारीने उडवतात. श्रावण मास सुरू झाला आहे आणि या महिन्याचा पहिला सोमवार निमित्त 'श्रावण सोमवार' च्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

## दिग्विजय बागल यांच्या हस्ते शिवसेनेच्या चार शाखांचे उद्घाटन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा तालुक्यात चिकलठाण परिसरातील शिवसेनेच्या चार शाखा चे उद्घाटन शिवसेना नेते दिग्विजय बागल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी करमाळा तालुक्यातील प्रत्येक गावात गाव तिथे शाखा सुरू करण्यात येणार असून याद्वारे लोकांच्या विविध समस्या सोडवण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन चिकलठाण येथील मुख्य कार्यक्रमात बोलताना त्यांनी केली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आजिनाथ कारखान्याचे माजी अध्यक्ष केरू गव्हाणे हे होते.

पुढे बोलताना बागल म्हणाले की आम्ही केवळ निवडणुकीपुरती लोकांच्या दारात जात नाही तर तालुक्याच्या सर्वसामान्य लोकांच्या सुखदुःखात कायम त्यांच्यासोबत असतो व करमाळा तालुक्यातील विविध अडचणी सोडवण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या माध्यमातून आपण प्रयत्नशील असून येणाऱ्या सर्व निवडणुका पूर्ण ताकतीनिशी लढवल्या जातील असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले व त्यांच्या हस्ते या परिसरातील केडगाव भुगाव चिकलठाण नंबर दोन चिकलठाण नंबर एक येथील चार शाखांचे शाखांचे उद्घाटन करण्यात आले चिखलठाण येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोर सभागृहात झालेल्या मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .व या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मच्छिंद्र सरडे यांनी केले. यावेळी मखाई सहकार्य साखर कारखान्याची संचालक दिनकर सरडे केरू गव्हाणे यांची भाषणे झाली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत चिकलठाणचे उपसरपंच अक्षय सरडे , राहुल गोळे, समाधान गव्हाणे , शशिकांत गव्हाणे, स्वस्तिक नलवडे , अँड दिगंबर साळुंखे ,यांच्या हस्ते करण्यात आले.

## प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशासाठी कॅप राऊंड-१ चे ऑप्शन्स फॉर्म भरण्याची प्रक्रिया दि.२६ जुलै पासून सुरू





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

'शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशाची पहिली फेरी (फर्स्ट कॅप राऊंड)चे ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया शनिवार, दि.२६ जुलै २०२५ पासून ते सोमवार, दि.२८ जुलै २०२५ पर्यंत म्हणजेच एकूण तीन दिवस चालणार आहे. या कालावधीत स्वेरी अभियांत्रिकीच्या स्क्रूटीनी सेंटर (एस.सी.क्रमांक ६२२०) मध्ये ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची सोय करण्यात आली आहे. प्रथम वर्ष इंजिनिअरिंगच्या या पहिल्या प्रवेश फेरीची अलॉटमेंट यादी अधिकृत संकेतस्थळावर गुरुवार दि.३१ जुलै २०२५ रोजी प्रसिद्ध होणार आहे. ज्यांनी पदवी अभियांत्रिकी प्रवेशासाठी कॅप रजिस्ट्रेशन, डॉक्युमेंट्स व्हेरिफिकेशन आणि कन्फर्मेशन केले आहे त्यांना या प्रवेश फेरीचा लाभ घेता येईल.' अशी माहीती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

### स्वेरीकडून विविध ठिकाणी मोफत सुविधा उपलब्ध

सन २०२५-२६ मध्ये पदवी अभियांत्रिकीच्या प्रवेशाकरीता ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, भरलेले अर्ज स्विकारुन कागदपत्रांची तपासणी, पडताळणी व निश्चिती करणे आदी प्रक्रिया पूर्ण झाल्या, त्यानंतर या प्रक्रियेला मुदतवाढही देण्यात आली होती व त्यानंतर तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाली. पुढे प्रवेश अर्जातील चुका व त्रुटींची दुरुस्ती (ग्रीव्हेंन्स) करण्याची प्रशासनाकडून मुभा देण्यात आली होती. या सर्व प्रक्रीयेनंतर पहिली फेरी (फर्स्ट कॅप राऊंड) चे ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया शनिवार, दि.२६ जुलै २०२५ पासून ते सोमवार, दि.२८ जुलै २०२५ पर्यंत या तीन दिवसात होणार आहे. या पहिल्या फेरीमध्ये योग्य आणि पसंतीचे महाविद्यालय अथवा योग्य ब्रँच बाबतचे पसंतीक्रम ऑनलाईन भरावे लागणार आहेत. यासाठी विद्यार्थी व पालकांनी पूर्णपणे अभ्यास करून कॅप राऊंड-१ चे ऑप्शन फॉर्म भरणे अत्यंत गरजेचे आहे. शनिवार, दि.२६ जुलै २०२५ पासून ते सोमवार, दि.२८ जुलै २०२५ या कालावधीत स्वेरीमार्फत मोहोळ, अनगर, मंगळवेढा, सांगोला, करकंब, कुर्डूवाडी, माढा, अकलूज, वेळापूर, टेंभुर्णी, बार्शी, धाराशिव, लोहारा या ठिकाणी प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंग प्रवेशासाठीच्या कॅप राऊंड - १ चे ऑप्शन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर ठिकाणी स्वेरीचे तज्ञ प्राध्यापक व त्यांचे सहकारी उपलब्ध असणार आहेत. त्यांचे संपर्क क्रमांक विद्यार्थी व पालकांपर्यंत लवकरच पोहचवले जातील तरी पालक व विद्यार्थ्यांनी या मोफत सुविधेचा लाभ घ्यावा.' असे आवाहन करण्यात आले आहे. महाविद्यालय निवडताना महाविद्यालयात दरवर्षी होणारे प्रवेश, विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल, कॅम्पस प्लेसमेंटची संख्या, वसतिगृह सुविधा, इतर सोयी-सुविधा, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग, संशोधने, मानांकने या महत्वाच्या बाबींचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे. प्रथम वर्ष इंजिनिअरिंगसाठी पहिल्या प्रवेश फेरीचे जागावाटप (अलॉटमेंट) गुरुवार, दि.३१ जुलै रोजी प्रदर्शित केले जाणार आहे. पहिल्या फेरीच्या जागावाटपानंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरून प्रवेशाची निश्चिती करावी लागणार आहे. प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंगच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ. करण पाटील (९५९५९२११५४) व प्रा.उत्तम अनसे (९१६८६५५३६५) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली तसेच अभियांत्रिकीला सातत्याने मिळत असलेल्या अभूतपूर्व यशाची पार्श्वभूमी, तसेच महाविद्यालयास मिळालेला ऑटोनॉमस दर्जा यामुळे पहिल्या फेरीला विक्रमी गर्दी होणार आहे, हे मात्र निश्चित.

## चिराग केणे याची राज्यस्तरीय जिम्नॅस्टिक्स ट्रॅम्पोलिन स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून राष्ट्रीय स्तरावर निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील आर. के. पालवी विद्यामंदिर, पडघा या इंग्रजी माध्यमातील इयत्ता सातवीत शिकणारा विद्यार्थी कु. चिराग मनोहर केणे यांनी इरा ग्लोबल स्कूल डोंबिवली येथे झालेल्या जिम्नॅस्टिक्स ट्रॅम्पोलिन स्पर्धेमध्ये राज्यस्तरावर उत्कृष्ठ कामगिरी करत महाराष्ट्र राज्य संघात स्थान मिळवल असून आता हा खेळाडू देहरादून येथे होणाऱ्या राष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स ट्रॅम्पोलिन चॅम्पियनशिप मध्ये आपल कौशल्य दाखवणार आहे. या यशामागे आर. के. पालवी विद्यामंदिर, पडघा आणि शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र पालवी यांचं मोठे योगदान आहे. गेली पाच वर्ष सतत नित्य नियमाने जिम्नॅस्टिक्सचा सराव करून त्याने हे यश संपादन केले आहे. यासाठी आकार जिम्नॅस्टिक्स बापगाव या अॅकॅडमीचे फार मोठे मोलाचे मार्गदर्शन मिळाले आहे. त्याच्या पुढील वाटचालीसाठी शिवसेनेचे गटनेते प्रकाश पाटील व शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र पालवी यांनी पुढील स्पर्धेसाठी विद्यार्थ्याला शुभेच्छा दिल्या आहेत. अतिशय मेहनत, चिकाटी व प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाने या विद्यार्थाने यश संपादन केले असून त्याच्यावर सर्वच स्तरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

## माळी विकास मिशनच्या वतीने संत सावता महाराजांचे चरित्र ग्रंथ प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब: प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : माळी विकास मिशन महाराष्ट्र च्या वतीने संत सावता महाराजांचे चरित्र ग्रंथ (पोथी) प्रकाशन राज्याचे ग्रामीण विकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे भाऊ, विधान परिषद सदस्य योगेश अण्णा टिळेकर, आणि माढा येथील आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

माळी विकास मिशन महाराष्ट्र च्या स्पर्धा परीक्षा व मार्गदर्शन समितीचे राज्य समन्वयक सन्माननीय अमृतराव काळोखे यांच्या सहाय्याने या चरित्र ग्रंथाचे पोथीचे प्रकाशन करण्यात आले यावेळी माळी विकास मिशन महाराष्ट्राच्या शिक्षण प्रसार समितीचे राज्य समन्वयक तथा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने हे उपस्थित होते. संत शिरोमणी सावता महाराज यांच्या जीवनचरित्राची उणीव गेल्या काही वर्षापासून भासत असल्याचे संत सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्ट अरणचे सचिव ह. भ. प. प्रभू महाराज आणि सावता महाराज यांनी निदर्शनास आणून दिली होती.ही बाब लक्षात घेऊन माळी विकास



मिशन महाराष्ट्र ने संत सावता महाराज जीवन चरित्र ग्रंथाचे प्रकाशन बुधवारी सकाळी दहा वाजता अरण येथील संत सावता महाराज मंदिरात प्रकाशन राज्याचे ग्रामीण विकास मंत्री सन्माननीय जयकुमार गोरे भाऊंच्या हस्ते केले.संत सावता भक्तांना हा ग्रंथ नाममात्र दरात उपलब्ध करून देण्यात आला आहे.विक्री व्यवस्था मंदिरासमोरील सावता महाराज यांच्या फुल स्टॉल वर करण्यात आली असून लवकरच राज्य भरातील प्रमुख पुस्तक विक्रेते यांचेकडे उपलब्ध करून दिली जाईल असे आश्वासन अमृतराव काळोखे यांनी दिले.सदरील कार्यक्रमास रविकांत महाराज,दादा महाराज, रमेश महाराज वसेकर कुटुंबियांसोबतच अखिल भारतीय माळी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष श्री गौतम क्षिरसागर, अभिमन्यू उबाळे मामा,अमर हजारे, मनोज माळी,जोतिराम कोरे, प्रदिप माळी,उमाकांत गोरे,महादेव माळी, दिलीप मेहेत्रे, राजाभाऊ माळी, सतीष शिंदे, समाधान इथापे,महेश इथापे, नागेश माळी, विक्रम हजारे रमाकांत हजारे उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरास करमाळा शहर व मंडळात उस्फूर्तपणे प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी करमाळा शहर मंडलाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरास नागरिकांच्या उस्फुर्त प्रतिसाद पाहायला मिळाला आहे त्यामध्ये एकूण ३५७ रक्तदात्यांनी स्वयंपूर्ण रक्तदान केले आहे. या रचनां शिबिराचे उद्घाटन भाजपा जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी तालुकाध्यक्ष काकासाहेब सरडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात महा रक्तदान अभियान राबवण्यात आला होता. याचाच एक भाग म्हणून आम्ही आमचे नेते गणेश भाऊ छोटे यांच्या नेतृत्वाखाली भाजप संपर्क कार्यालय येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले व या शिबिरामध्ये नागरिकांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवून सामाजिक




कार्यातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष अफसर जाधव, रामभाऊ ठाणे, ज्येष्ठ नेते भगवान गिरी गोसावी, बाळासाहेब कुंभार ,सूर्यकांत पाटील, तालुका सरचिटणीस नितीन झिंजाडे, आजिनाथ सुरवसे , अमोल पवार, दादासाहेब देवकर बंडू शिंदे सोमनाथ घाडगे लक्ष्मण शेंडगे ,राजू सय्यद हर्षल शिंगाडे, प्रकाश ननवरे , संजय जमदाडे , अतिथी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या पूजेची २८ जुलै पासून ऑनलाईन नोंदणी

## सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर; १ ऑगस्ट ते ३१ डिसेंबर २०२५ मधील पुजांची होणार नोंदणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यपुजा, पाद्यपूजा, तुळशी अर्चन पूजा, महानैवेद्य सहभाग योजना इत्यादी सर्व प्रकारच्या पूजा श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. दि. ०१ ऑगस्ट ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीतील पुजांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात दि.२८ जुलै रोजी स.११.०० पासून होत असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

याबाबत मंदिर समितीच्या दि. १५ जून रोजीच्या सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. भाविकांना पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे.

यापूर्वी पहिल्या टप्प्यात दि. ७ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२४, दुसऱ्या




टप्प्यात दि.१ जानेवारी ते ३१ मार्च २०२५ तसेच तिस-या टप्प्यात दि. ०१ एप्रिल ते ३१ जुलै २०२५ या कालावधीतील

### महानैवेद्य सहभाग योजनेचा देखील समावेश

श्रींच्या नित्यपूजा, तुळशी अर्चन पूजा व पाद्यपूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली होती. यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

आता, चौथ्या टप्प्यात दि. ०१ ऑगस्ट ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा व पाद्यपूजा तसेच दि. ०१ ते ३१ ऑगस्ट, २०२५ कालावधीतील तुळशी अर्चन पुजा व महानैवेद्य सहभाग योजना ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना


**श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या नित्यपूजेसाठी अनुक्रमे रु.२५,०००/-, रू.११,०००/- तसेच पाद्यपूजेसाठी रू.५,०००/- व तुळशी अर्चन पूजेसाठी रू.२१००/- तसेच महानैवेद्य सहभाग योजनेसाठी रू.७,०००/- इतके देणगी मुल्य आहे.**

उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल. याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६ -२९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा. याशिवाय पूजेचे बुकिंग मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरूनच करावे कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीस संपर्क करू नये असे आवाहन कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यावेळी सांगितले.

# विक्रोळी पार्कसाईटमध्ये संरक्षण भिंतींच्या कामात महाघोटाळा

**संरक्षण भिंतींच्या निधीलाचं संरक्षणाची गरज**

विक्रोळी/केतन भोज) : म्हाडा मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या अखत्यारीत येणाऱ्या मुंबईतील विक्रोळी पार्कसाईट येथील संरक्षक भिंतींच्या कामांमध्ये महाघोटाळा झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.विक्रोळी पार्कसाईट मध्ये बहुतांश मोठ्या प्रमाणावर डोंगराळ भाग आहे त्यामुळे याठिकाणी पावसाळ्यात दरडीचा भाग कोसळून होणाऱ्या दुर्घटनांमध्ये लगतच्या परिसरात राहणाऱ्या रहिवाशांना याचा नाहक त्रास सहन करावा लागतो.या घटनांना आळा घालण्यासाठी म्हाडाने ठिकठिकाणी दरडीच्या ठिकाणी संरक्षण भिंती बांधण्यासाठी जिल्हाधिकारी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून आवश्यक निधी मंजूर करून त्यासाठी निधी देखील पास केला होता.विक्रोळी पार्कसाईट मध्ये एकूण २७ संरक्षण भिंतींच्या कामासाठी आतापर्यंत निधी मंजूर होऊन त्या म्हाडा मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत मंजूर ही झाल्या आहेत.तसेच अजून ही पुढे विक्रोळी पार्कसाईट करिता नऊ संरक्षण भिंतींच्या कामासाठी निधी मंजूर झाला आहे.फक्त आता त्याच्या वर्क ऑर्डर निघायच्या बाकी आहे.मात्र प्रत्यक्षात याठिकाणी संरक्षण भिंतींच्या कामासाठी निधी मंजूर आणि वर्क ऑर्डर निघून देखील संरक्षण भिंतींचे बांधकाम चालू झालेले नाही.तसेच काही ठिकाणी संरक्षण भिंतीचे बांधकाम याआधी पूर्ण होऊन ही त्या पुन्हा- पुन्हा नव्याने मंजूर केल्या गेल्या आहेत असा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.मग एवढा निधी कुठे गेला ? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक संबंधित प्रशासनाला विचारत आहेत.या पावसाळ्यात देखील विक्रोळी पार्कसाईट मधील डोंगराळ भागात संरक्षण





भिंतींअभावी दरड कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत.अखेर येथील स्थानिक लोकांना जीव मुठीत घेऊन जगाव लागत आहे.मात्र तरी संबंधित प्रशासनाला याचे काहीही देणेघेणे नसल्याचे याठिकाणी दिसत आहे.म्हाडाच्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत डोंगर उतारांवरील भागांमध्ये संरक्षण भिंत उभारण्यात येतात.लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून हे काम केले जातंय.मात्र सध्या स्थितीत विक्रोळी पार्कसाईट मध्ये संरक्षण भिंतीच्या कामात मोठ्या प्रमाणावर महाघोटाळा झाला असल्याचे चित्र दिसत आहे.याठिकाणी संरक्षण भिंती उभारण्याच्या नावाखाली कोट्यवधी रुपये लाटल्याचा धकादायक प्रकार विक्रोळी पार्कसाईट मध्ये समोर आला आहे.विक्रोळी पार्कसाईट मधील अनेक भागांमध्ये संरक्षण भिंती उभारण्याच्या नावाखाली,तद्दन खोटे कागदी घोडे नाचवत यामध्ये कोणत्या लोकप्रतिनिधीच्या कंत्राटदाराला खुश करण्यासाठी फक्त संरक्षण भिंतींच्या नावाखाली टेंडर काढली जात आहेत का?तसेच यामध्ये संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत कोट्यवधी रुपये लाटल्याचं धडधडीत प्रकार याठिकाणी समोर आला आहे.यामध्ये म्हाडा दक्षता विभागाची भूमिका देखील संशयास्पद असल्याची दिसत असून,यामुळेच विक्रोळी पार्कसाईट मध्ये संरक्षण भिंतींच्या कामात महाघोटाळा झाल्याचे तरी दिसत आहे. म्हणूनच निव्वळ संरक्षण भिंतींचे खोटेनाटे बुजगावणे उभे करत स्थानिक रहिवाशांच्या जिवाशी खेळ करणाऱ्या संबंधित प्रशासनाचा याठिकाणी पर्दाफाश करावा असे मत स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.तसेच आता या संरक्षण भिंतींच्या निधीलाच संरक्षण देण्याची गरज याठिकाणी दिसत आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे तसेच श्री संत नामदेव महाराज पायरीचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी उपमुख्यमंत्री श्री शिंदे यांच शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी सर्वश्री आमदार समाधान आवताडे, अभिजीत पाटील, उत्तम जानकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मंदिर समितीचे सदस्य



ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर, तहसीलदार सचिन लंगुटे,मुख्याधिकारी महेश रोकडे, महाराज मंडळी तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेला. व छत्रपतींचे समाधी स्थळ असलेला व हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेला रायगड किल्ला छत्र निजामपूर हे नाव असलेल्या ग्राम पंचायत अंतर्गत येत होता.

गेल्या एक महिन्यापूर्वी लोकनेते आमदार गोपीचंद पडळकर या किल्लयावर भेट देण्यासाठी गेले असता तेथील नागरिकांनी हा प्रकार त्यांच्या लक्षात आणून दिला. निजामाच्या खुणा पुसण्याच्या उद्देशाने छत्रपतींनी स्वराज्य उभा केलं परंतु रायगड किल्ला निजामपूर ग्रामपंचायत येतो हे खेद जनक गोष्ट असल्याचे पडळकर यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्रामविकास मंत्री जयकुमार भाऊ गोरे यांच्याकडे हे नाव बदलून रायगड वाडी ग्रामपंचायत करावी अशी मागणी केली होती.

अधिवेशन काळामध्ये देवेंद्र फडणवीस साहेबांच्या नेतृत्वाखाली राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे भाऊ यांनी छत्रनिजामपुर हे नाव बदलून रायगड वाडी ग्रामपंचायत हे नाव जाहीर केले. त्यामुळे छत्रपतींच्या स्वराज्याचा सन्मान नक्की वाढला. हे हिंदुत्ववादी सरकार निजामाच्या व मोगलांच्या सर्व खुणा संपवत असल्याचा अभिमान आहे म्हणून आज भारतीय जनता पार्टी यांच्यावतीने पालकमंत्री महोदयांचा जिल्हाध्यक्ष



चेतन सिंह केदार व माऊली भाऊ हळणवर व सांगलीचे नेते पप्पू शेठ डोंगरे यांच्या हस्ते जयकुमार गोरे भाऊंचा सत्कार करून आभार मानले. यावेळी माढा मंडलाचे अध्यक्ष योगेश पाटील टेंभुर्णी मंडळाचे अध्यक्ष योगेश बोबडे यांच्या सह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

# बार्टीतील विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणात्मक प्रशिक्षण देण्यात यावे : ना. माधुरी मिसाळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने राबविण्यात येणारे सामाजिक नागरी विकास योजना, रमाई घरकुल योजनेचा गरजु लोकांना लाभ मिळाला पाहिजे . तसेच शासकीय वस्तीग्रहातील मुला मुलींना आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावे. डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना देण्यात येणारे णझडउ व चझडउ आणि खइझड, पोलिस भरती प्रशिक्षण हे गुणात्मक व दर्जेदार देण्यात यावे असे निर्देश समाजकल्याणच्या राज्यमंत्री ना. श्रीमती माधुरी मिसाळ यांनी समाजकल्याण व बार्टी संस्थेच्या आढावा बैठकीत दिले.

ना. माधुरी मिसाळ - राज्यमंत्री, नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण अल्पसंख्याक व ओकाफ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ जुलै २०२५ रोजी बार्टी, पुणे मुख्यालयात समाजकल्याण व बार्टी संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला.

या बैठकीला श्री नारायण कुचे - आमदार तथा अध्यक्ष , अनुसूचित जाती कल्याण समिती महाराष्ट्र शासन , श्री सुनिल कांबळे, आमदार कॅन्टोन्मेंट मतदार संघ, पुणे, श्रीमती दिपा मुधोळ , आयुक्त - समाजकल्याण, पुणे श्री राकेश बेद , महाव्यवस्थापक - संत रोहिदास विकास महामंडळ, श्री एम जि सांगळे, व्यवस्थापक - साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, श्री भारत केन्द्रे, महाव्यवस्थापक - लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, श्रीमती वंदना कोचुरे, प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण, पुणे यांच्यासह समाजकल्याण व बार्टी संस्थेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रास उपस्थित मान्यवरांनी पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांनी मा मंत्रीमहोदय, उपस्थित आमदार, व मान्यवरांना महामानव हा ग्रंथ आणि रोपटे भेट देऊन स्वागत केले.

बार्टी संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती मा महासंचालक श्री वारे व निबंधक श्रीमती इंदिरा



अस्वार यांनी यावेळी दिली.

मा मंत्रीमहोदय यांनी या आढावा बैठकीत समाजकल्याण अंतर्गत महामंडळे, बार्टी तसेच आर्टी च्या विविध योजनांची माहिती घेतली. प्रास्ताविक प्रकल्प व्यवस्थापक श्री नितिन सहारे यांनी केले.

**आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीकरिता शहापूर तालुका राष्ट्रवादी सज्ज**

**आमदार दौलत दरोडा यांचे प्रतिपादन**

# शहापूरमध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर(ठाणे )/ विजय घनघाव : राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे राष्ट्रीय अध्यक्ष ना. अजितदादा पवार यांचा वाढदिवस शहापूर तालुक्यात राष्ट्रवादी मय वातवरणात आणि अतिशय जल्लोषात साजरा करण्यात आला.

अजितदादा पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत शहापूर शहरात राष्ट्रवादी काँग्रेस चे कार्यालया चे उदघाटन करण्यात आले.शहापूर विधानसभा आमदार आणि अनुसचित जमाती कल्याण समिती अध्यक्ष दौलत दरोडा आणि तालुक्यातील ज्येष्ठ नेते जयतू भोईर यांच्या हस्ते कार्यालय चे उदघाटन करण्यात आले.

तालुक्यातील नागरिकांच्या समस्या /तक्रारी निवारण करणे व गरजूना शक्य ती मदत या कार्यालयाच्या माध्यमातून करण्यात येईल असे आमदार दौलत दरोडा यांनी म्हटलं आहे.





उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवस निमित्त शहापूर विधानसभा क्षेत्रामधील जिल्हा परिषद व पंचायत समिती गण निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विविध कार्यक्रमांचे व शहापूर विधानसभा मतदारसंघात वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

शहरातील पंचायत समिती शिवतीर्थ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून,पुढे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून शहापूर शहरातून रॅली निघून चेरपोली मार्गे आसनगाव येथे रवाना झाली. यावेळी आसनगाव पूर्व येथील तुळशी विहार परिसरामधील रस्त्यांचे लोकार्पण करण्यात आले तसेच आसनगाव पश्चिम येथील हनुमान मंदिर येथे सभामंडप चे लोकार्पण कारण्यात आले.

यानंतर वासिंद येथे छोटेखांनी व्यवसाय करणाऱ्याना छत्री वाटप करण्यात आले. रॅलीमधील पुढील प्रवासात शेरे,शेंद्रुण, किन्हवली बाभळे येथे मूकबधीर विद्यालय येथे वह्या वाटप कार्यक्रम हाती घेण्यात आला. पुढे शेणवा विश्रामगृह येथे वृक्षारोपण आणि प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वृषारोपण करण्यात आले.

पुढे डोळखांब, खर्डी विभागागा मधून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्प हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. एकंदरीत संपूर्ण रॅली आणि राष्ट्रवादी कार्यकर्ते यांचा जोश पाहता आम्ही शहापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी सज्ज आहोत अशा आविर्भावा मध्ये वातावरण आहे असंच चित्र जणू पहायला मिळत होते. असं चित्र म्हणजे खरोखर पुढील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकसाठी आम्ही तयार आहोतच, असं मत आमदार दौलत दरोडा यांनी व्यक्त केले.

यावेळी प्रत्येक ठिकाणी आमदार दरोडा व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यांचे यावेळी यथोचित स्वागत करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्री. संजय तिवरे , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश चिटणीस डी. के.विशे सर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सचिव श्री. रविंद्र परटोले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ठाणे जिल्हा ग्रामीण महिला अध्यक्षा सौ. कल्पना तारमळे, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल शेवाळे, उपाध्यक्षा सौ.कविता विशे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहापूर तालुका अध्यक्ष डॉ. श्री. मनोहर सासे, विधानसभा क्षेत्र अध्यक्ष श्री.तुकाराम वेखंडे , कार्याध्यक्ष श्री. अरुण मांजे, शहापूर तालुका संपर्क प्रमुख श्री. दिपक लकडे, श्री. राजेश तिवरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहापूर उप तालुका अध्यक्ष श्री. शैलेश खर्डीकर, युवक तालुका अध्यक्ष श्री. दिनेश चंदे, सर्व शहर अध्यक्ष, सर्व सेल अध्यक्ष, तसेच विविध विभागाचे अध्यक्ष व मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# संत नामदेव महाराजांचे जन्मस्थान हे चालते बोलते विद्यापीठ : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## संत नामदेव महाराजांच्या जन्मभूमीवर पुरस्कार मिळणे हे माझे भाग्य




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/पंढरपूर : संत नामदेव महाराजांचे जन्मस्थान हे चालते बोलते विद्यापीठ आहे. संत नामदेव महाराज यांनी भागवत धर्माची पताका महाराष्ट्र बाहेर नेली, रुजवली व वाढवली. त्यामुळे वारकऱ्यांना देशभर प्रतिष्ठा आहे. तसेच वारीच्या माध्यमातून देशभरातून लाखो भाविक पंढरपूरात येतात आणि त्यांच्या सुख, समृद्धी व सेवेसाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

संत शिरोमणी नामदेव महाराज परिवार व संत जनाबाई यांच्या षष्ठशतकोत्तर (६७५ वा) संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त भक्त शिरोमणी संत श्री नामदेव महाराज पुरस्कार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना संत नामदेव महाराज यांच्या वंशाच्या कडून संत नामदेव महाराज मंदिर येथे प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

यावेळी सर्वश्री आमदार समाधान आवताडे, अभिजीत पाटील, उत्तम जानकर, माजी आमदार शहाजी बापू पाटील, माजी आमदार जयवंत जगताप, सकल संत वंशज तथा संत समाधी संस्थान प्रमुख, विश्वस्त, फडकरी, जेष्ठ कीर्तनकार मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, संत नामदेव महाराजांच्या जन्मभूमीवर पुरस्कार मिळणे हे मी माझे भाग्य समजतो. तसेच हा पुरस्कार वैयक्तिक सन्मान मानण्याऐवजी सहकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ म्हणून स्वीकारल्याची भावना व्यक्त केली. हा पुरस्कार कोणत्याही पदापेक्षा मोठा असल्याचे त्यांनी म्हटले.

शेतकरी व वारकरी यांचा विकास हे प्राधान्य असून संत नामदेवांच्या शिकवणीप्रमाणे तळागाळातील प्रत्येकाचा सर्वांगीण विकास अपेक्षित आहे. शासन धार्मिक अधिष्ठानास

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज पुरस्काराने सन्मानित

राजकीय अधिष्ठानापेक्षा प्राधान्य देत असून, महाराष्ट्रातील तमाम साधू-संतांच्या सेवेसाठी कटिबद्ध आहे, असेही श्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. इतिहासात प्रथमच वारकऱ्यांच्या दिंड्यांसाठी शासनाने अनुदान जाहीर केले असून विमा सुरक्षा, आरोग्य तपासणी शिबिरे, शुद्ध पाणी, निवास, स्वच्छता इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. हा सगळा विकास लोकांना विश्वासात घेऊन आणि पांडुरंगाच्या आशीर्वादाने होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

तीर्थक्षेत्र विकास व संस्कार केंद्रांचा महत्त्व

महाराष्ट्रातील प्रत्येक तीर्थक्षेत्राला सरकारने देणगी दोन कोटी रुपयांवरून पाच कोटीपर्यंत वाढवली आहे. मंदिरांना संस्कार केंद्र मानून महाराष्ट्र सरकारने गोमातेला राज्य मातेचा दर्जा दिला. तसेच महाराष्ट्रात वारकरी संप्रदायासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळामार्फत वारकऱ्यांच्या गरजांवर अधिक प्रभावीपणे काम केले जाणार आहे, अशी माहिती श्री शिंदे यांनी दिली. तसेच पांडुरंग आपल्या प्रत्येक वारकऱ्यात आहे, ही भावना त्यांनी व्यक्त केली आणि धर्मरक्षण ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे ठामपणे सांगितले. संत नामदेवांनी भक्तीबरोबरच ज्ञानाचा प्रसार केल्यामुळे त्यांची शिकवण देशभर पसरली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

संतांचे विचार आणि वारकरी संतरंपरा हीच महाराष्ट्राची ओळख आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी, वीरांची भूमी आणि छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी आहे. त्यांची शिकवण नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हेच आपले कर्तव्य असल्याचे श्री शिंदे यांनी यावेळी म्हटले.

प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केशवराज यांचे दर्शन घेतले व त्यानंतर नामदेव महाराजाच्या वंशज यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज पुरस्काराने सन्मानित केले. यावेळी त्यांना पगडी विना तसेच सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या संस्थांच्या वतीने देण्यात आलेला श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज हा पहिलाच पुरस्कार श्री. शिंदे यांना देण्यात आलेला आहे.

अक्षय महाराज भोसले यांनी प्रास्ताविक केले यामध्ये त्यांनी श्री संत शिरोमणी नामदेव महाराज व त्यांचे वंशज यांच्या परंपरेंची व कार्याची माहिती दिली तसेच हा पुरस्कार देण्यामागचा उद्देश सांगितला. यावेळी ह. भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर, राणा महाराज वासकर यांनी आपले विचार व्यक्त केले.

# महिलांनी आपल्या अधिकारांचा वापर करायला शिकले पाहिजे : डॉ. मेधा सायखेडकर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

आजची महिला पुरुषाच्या बरोबरीने उभी आहे, काही क्षेत्रात ती पुरुषांच्या दोन पावले पुढे गेली असली तरी आपण पाहतो की तिला अजूनही घरगुती हिंसाचारास सामोरे जावे लागते. तिच्यावर अन्याय अत्याचाराच्या बातम्या आजही जेव्हा वर्तमानपत्रात येतात तेव्हा विषन्न व्हायला होतं की महिलांनी स्वत:ला ओळखायला हवे आहे. आपल्या मुलभूत अधिकारांचा वापर करायला शिकले पाहिजे. तेव्हाच आजची महिला ही सक्षम झाली असे म्हणता येईल असे प्रतिपादन डॉ. मेधा सायखेडकर यांनी केले.

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित, के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक महाविद्यालय काकासाहेबनगर महाविद्यालयात गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत महिला सबलीकरण व सक्षमीकरण कार्यशाळा पार पडली कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. मेधा सायखेडकर यांच्या हस्ते करण्यात आले या प्रसंगी त्या बोलत होत्या.

### काकासाहेबनगर महाविद्यालयात महिला सबलीकरण कार्यशाळा

कार्यशाळेत प्रमुख व्याख्याता डॉ. रोहिणी सरवार उपस्थित होत्या. त्यांनी महिलांचे आरोग्य' याविषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की महिला आपल्या आरोग्याच्याबाबतीत जागरूक नसतात. महिलांनी आपले आरोग्य चांगल्या तऱ्हेनं जपलं पाहिजे. सकस आहार, नियमित योगा, प्राणायाम करावा. जेणेकरून आपले आरोग्य आपण निरोगी राखू शकू.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सल्लागार डॉ. आर. के. दातीर उपस्थित होते.

महिला सबलीकरण विभागाच्या समन्वयक डॉ. भावना पौळ यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. सुनीता शिरसाठ करून दिली तर, सूत्रसंचालन वैष्णवी कुशारे व सत्या कुशारे यांनी केले, आभार डॉ. प्रतिभा बाहेकर यांनी मानले.

कार्यक्रमास आय.क्यू. ए. सी. समन्वयक प्रा. मिलिंद पवार, प्रा. शीतल जगताप, डॉ. अरुण ठोके, प्रा. वैशाली शिंदे, प्रा. काजल वाघ, प्रा. कविता कोल्हे, प्रा. मुक्ता मोरे, प्रा. भारती कुशारे, प्रा. अर्चना ताकाटे, प्रा. जयश्री कापडी आदी प्राध्यापक,व प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

# रामनगर सज्जनगड - सिद्धार्थ सोसायटी येथील नाल्यावरील जीर्ण झालेला पूल धोकादायक स्थितीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(केतन भोज);राम नगर ब प्रभाग क्रमांक १२३ मधील सज्जनगड सोसायटी - सिद्धार्थ सोसायटी येथील मुख्य मोठ्या नाल्यावरील स्थानिक रहिवाशांकरिता असलेला नाल्यावरील पूल धोकादायक स्थितीत झाला असून या नाल्याच्या मुख्य बांधकामाला आणि नाल्यावरील पुलाला मोठे भगदाड पडले आहे.तर नाल्याचा काही भाग हा खचला आहे त्यामुळे तो आता पावसाळ्यात कधीही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.परिणामी येथील स्थानिक सोसायट्यांना जोडणाऱ्या या नाल्यावरील मुख्य पूलावरून स्थानिक नागरिक आपला जीव मुठीत घेऊन रोज येजा करत आहेत.तसेच या धोकादायक ठरत असलेल्या नाल्याच्या आजूबाजूला राहणाऱ्या स्थानिक नागरिकांना तसेच लहान मुलांना देखील आपला जीव मुठीत घेऊन याठिकाणी राहावे लागत आहे.परिणामी याठिकाणी आता धोकादायक परिस्थिती निर्माण झाली असून हा पूल आता कधीही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.तसेच येथील स्थानिक नागरिकांसाठी हा पूल येण्या - जाण्याचा हा एकमेव मार्ग असल्यामुळे जर हा धोकादायक पूल कोसळ्यास स्थानिकांचा येण्या-जाण्याचा मार्ग बंद होऊ शकतो.तरी

### स्थानिक नागरिकांचा जीवमुठीत घेऊन प्रवास





या समस्येकडे पालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत आहे,असे येथील स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.या मुख्य नाल्यावरील पुलाच्या दुरुस्तीसाठी किंवा पुनर्बांधणीसाठी पालिका प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होताना दिसत नसल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये मनपा प्रशासनाच्या विरुद्ध नाराजी व्यक्त होताना दिसत आहे.तरी सज्जनगड - सिध्दार्थ सोसायटी येथील मुख्य नाल्यावरील जीर्ण पुलाच्या या समस्येकडे संबंधित मनपा पालिका प्रशासनाने दुर्लक्ष करणे अत्यंत गंभीर आहे.मनपा प्रशासनाने यावर त्वरित कार्यवाही करणे आवश्यक असून,जेणेकरून स्थानिक नागरिकांची गैरसोय दूर होईल आणि कोणतीही दुर्घटना होणार नाही याची हमी घेणे देखील तितकेच गरजेचे आहे.

# जात पडताळणी प्रमाणपत्र वेळेवर द्या अन्यथा कार्यालयाला टाळे ठोकणार : अविनाश मडिखांबे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट(तालुका प्रतिनिधी) दि:२३ सोलापूर जिल्ह्यातिल विध्यार्थी,नौकरदार,पदोन्नती साठी व नविन नौकरभरतीसाठी लागणारे जात पडताळणी प्रमाणपत्र वेळेवर द्यावे अन्यथा अक्कलकोट रिपाइं कडून जात पडताळणी कार्यालयास कुलुप ठोकण्याचा इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) अक्कलकोट च्या तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी दिली आहे.



सामाजिक न्याय भवन सोलापूर यांच्या कार्यालया मार्फत देण्यात येणाऱ्या जात पडताळणी प्रमाणपत्र मुद्दाम आडवले जात असून त्या दाखले एजंटा मार्फत मोठ्या आर्थिक व्यवहारांने केली जात आहे. यामुळे अनेक विध्यार्थी, नौकर वर्ग, नवीन नौकर भरती, पदोन्नतीसाठी लागणारे जात पडताळणी प्रमाणपत्र मुद्दाम अडवणूक करुन संबंधीत एजंटा मार्फत लाभार्थ्याकडून आर्थिक लूट करुन त्यांच्या मानसीक आणी आर्थिक छळ केली जात आहे. तरी हे सगळे धंदा बंद केली पाहिजे.आणी वेळेवर लाभार्थ्यांना एक पैसाही न घेता दाखला दिले पाहिजे,अन्यथा अक्कलकोट रिपाइं कडून भ्रष्ट कर्मचाऱ्यांना व अधिकारी समिती अध्यक्ष सचिव सहा कार्यालयास कुलुप ठोकण्याचा इशारा मडिखांबे यांनी दिला आहे.

**विविध धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम संपन्न**

**हजारो भक्तगणांच्या व सुवासिनीच्या उपस्थितीत नयनरम्य सोहळा**

# भाग्यवंती देवी प्रकट दिन व पाळणा कार्यक्रम उत्साहात







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

वागदरी येथील जागृत भाग्यवंती देवीची नयनरम्य पाळणा कार्यक्रम यासह विविध कार्यक्रम घेण्यात आले. कर्नाटक महाराष्ट्र सीमेवर असलेले भाग्यवंती देवस्थान जागृत व नवसाला पावणारी म्हणून आ-ेळखली जाणारी श्री भाग्यवंती देवीची नयन रम्य व भव्य दिव्य असा पाळणा कार्यक्रम हजारो भक्तगणांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

सालाबादाप्रमाणे यावर्षीही श्री भाग्यवंती देवी प्रकट दिन व पाळणा कार्यक्रमानिमित्त विविध धार्मिक सांस्कृतिक सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला होता. २३ जुलै रोजी रात्री भजन भारुड कीर्तन या कार्यक्रमाने जागरण करण्यात आला.

दिनांक २४ जुलै गुरुवार रोजी पहाटे श्री भाग्यवंती देवीच्या मूर्तीस महारुद्र अभिषेक त्यानंतर नवग्रह पूजा दाम्पत्य पूजा, महारुद्र अभिषेक पूजा व होम हवन तदनंतर दुपारी एक वाजता हजारो भक्तगणांच्या व सुवासिनीच्या उपस्थितीत नयनरम्य भव्य दिव्य असा पाळणा कार्यक्रम व प्रकट दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला सदर कार्यक्रम ष नि प्र शिवलिंगेश्वर महास्वामी वीरक्त मठ वागदरी यांच्या आशीर्वादाने व दिव्य सानिध्यात पार पाडण्यात आला.

**यावेळी महाप्रसादाचे नियोजन चांगल्या प्रमाणे करण्यात आले होते महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते यंदा पहिल्यांदाच सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच वतीने वागदरी ते भाग्यवंती देवी मंदिर परत वागदरी पर्यंत मोफत वाहन ठेवण्यात आले होते यांची सर्वत्र कौतुक होत आहे सर्व चालक मालक यांचे सागर दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते भाग्यवंती देवी चरिटेबल ट्रस्ट वतीने सन्मान करण्यात आले**

सदर कार्यक्रमास हन्नूर गावाचे उपसरपंच सागर कल्याणशेट्टी व शेळके प्रशालाचे चेअरमन बसवराज शेळके, गोगावचे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, प्रदीप जगताप सुनील सावंत शानपा मांगाणे, या मान्यवरांनी उपस्थित राहून शोभा वाढवली. सदर पाळणा व प्रकट दिन कार्यक्रमास महाराष्ट्र कर्नाटक मराठवाडा मुंबई पुणे सह पंचक्रोशीतील हजारो भक्त गणांनी उपस्थित राहून दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री भाग्यवंती देवी चारिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष काशिनाथ पोमाजी, सिद्धाराम यमाजी, सुरेश सावंत,मल्लिनाथ परीट, बसवराज पोमाजी, रुद्रप्पा हुगे , महादेव सरसंबी, श्याम बाबर, महादेव सोनकवडे सह गावकऱ्यांनी परिश्रम घेतला उपस्थित सर्व भक्तांना महाप्रसादाची सोय करण्यात आला होता.